**नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी निवडणुकीमध्ये करावयाच्या खर्चाची राज्य निवडणूक आयोगाने निश्चित करुन दिलेली कमाल मर्यादा काढून टाकण्याबाबत...**

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.४(१)/का.५,
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०६/०२/२०१५

**वाचा :- १. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२००४/प्र.क्र.९/का.५, दि.२०/१२/२००४**
**२. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.मनप-२००४/प्र.क्र.३१/का.६, दि.२०/१२/२००४**
**३. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.४(१)/का.५, दि.३०/०७/२०११**
**४. शासन निर्णय नगरविकास विभाग क्र.संकीर्ण-२००६/५१२/प्र.क्र.८९/२००६/नवि-२०, दिनांक १६/०७/२००७**

## आदेश

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने उपरोक्त दिनांक २०/१२/२००४ च्या दोन स्वतंत्र आदेशान्वये तसेच दिनांक ३०/७/२०११ च्या आदेशान्वये राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी निवडणुकीमध्ये करावयाच्या खर्चाची कमाल मर्यादा वेळोवेळी निश्चित करुन दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी, भारतीय संविधानातील अनुच्छेद २४३ के व अनुच्छेद २४३ झेडए नुसार राज्य निवडणूक आयोगावर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका न्याय्य, मुक्त व पारदर्शक रितीने पार पाडण्याची संविधानिक जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. तसेच भारतीय संविधानामध्ये भारत निवडणूक आयोग व राज्य निवडणूक आयोगाला समान दर्जा देण्यात आलेला आहे.

आणि ज्याअर्थी, मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपिल क्र.५७५६/२००५, श्री. किशनसिंग तोमर वि. अहमदाबाद महानगरपालिका व इतर मध्ये दि.१९/१०/२००६ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये राज्य निवडणूक आयोगाचा दर्जा, अधिकार व जबाबदा-या भारत निवडणूक आयोगाशी समतूल्य आहेत. तसच राज्य निवडणूक आयुक्तांना त्यांची जबाबदारी पार पाडण्यासाठी आवश्यक ती सर्व साधनसामग्री व मनुष्यबळ राज्य शासनाने उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे असे नमूद करण्यात आलेले आहे.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगावर असलेली संविधानिक जबाबदारी योग्यरितीने पार पाडण्याच्या दृष्टीने भारत निवडणूक आयोगाकडून घेण्यात येणा-या लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या वेळी ज्या पध्दतीने व ज्या ज्या बाबींवर कार्यवाही केली जाते त्या सर्व बाबींवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या वेळी कार्यवाही केली जाणे अनिवार्य आहे. अशा परिस्थितीत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना खर्चाची कमाल मर्यादा घालून दिल्यास या मर्यादेचे पालन करुन वरीलप्रमाणे कार्यवाही करणे शक्य होणार नाही. परिणामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पारदर्शक व मुक्त वातावरणात पार पाडता येणे शक्य होणार नाही.

त्याअर्थी आता, वरील सर्व बाबी विचारात घेऊन राज्य निवडणूक आयोगाचे उपरोक्त दिनांक २०/१२/२००४ चे दोन स्वतंत्र आदेश व दिनांक ३०/०७/२०११ चे आदेश अधिक्रमित करण्यात येत असून राज्य निवडणूक आयोगाने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये करावयाच्या खर्चासाठी घालून दिलेली कमाल मर्यादा काढून टाकण्यात येत आहे. तसेच सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना असे आदेश देण्यात येत आहेत की, भारत निवडणूक आयोगाकडून घेण्यात येणा-या लोकसभा / विधानसभा निवडणुकांच्या वेळी ज्या ज्या बाबींवर कार्यवाही केली जाते अशा सर्व आवश्यक बाबींवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही कार्यवाही करण्यात यावी. त्यासाठी कराव्या लागणा-या खर्चासाठी दरवर्षी आवश्यक अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात यावी. तसेच या निवडणुकांवर खर्च करताना वित्तीय औचित्याच्या तत्वांचे पालन केले जाईल तसेच आवश्यक बाबींवर खर्च करताना तो काटकसरीने केला जाईल याची दक्षता घेण्याची संपूर्ण

जबाबदारी संबंधित महानगरपालिका आयुक्त / जिल्हाधिकारी यांची राहील व त्यासाठी ते जबाबदार राहतील.

सदर आदेश राज्य निवडणूक आयोगाच्या www.mahasec.com या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :-

१. प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२. सर्व विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन
३. सर्व महानगरपालिका आयुक्त
४. सर्व जिल्हाधिकारी
५. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
६. सर्व नगरपरिषद / नगरपंचायती यांचे मुख्याधिकारी
७. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी / सर्व कार्यासने
८. मा.राज्य निवडणूक आयुक्तांचे स्वीय सहायक
९. सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक
१०. निवड नस्ती



C:\wagle pc data\General letter २०१४.docx
एच-११७४ -२.